# प्रकरण - क्र. ११६ ते १२१

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|

## अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त -१ /ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०९/०२/२०१७.

# मा. विशेष स्थायी समिति सभा

**सभा सूचना क्र. :- १३ दिनांक ०९/०२/२०१७**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ______________________

स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा शुक्रवार दि. १०/०२/२०१७ रोजी दुपारी १२.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १३, दि. ०९/०२/२०१७ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

**मा. सभापती, स्थायी समिती यांचे मान्यतेने.**

(वासुदेव शिरवळकर)
**प्र. नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. विशेष स्थायी समिती सभा सुचना क्रमांक १३, दि. ०९/०२/२०१७ सोबतची विषय पत्रिका
## सभा शुक्रवार दि. १०/०२/२०१७

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| ११६ | मौजे उत्तन, पाली येथे घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाकरीता DBFOT तत्वावर प्राप्त झालेली निविदेस मंजूरी मिळणेबाबत. |
| ११७ | सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ "अ" + "क" + "अग्निशमन" + "अंध व अपंग" + "महिला व बालकल्याण" + "JNNURM" + "P" अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे. |
| ११८ | सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे "अग्निशमन अंदाजपत्रक" मा. स्थायी समितीस सादर करणे. |
| ११९ | वृक्षप्राधिकरण समितीने मंजुर केलेले सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे. |
| १२० | शिक्षण विभागाचे सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे. |
| १२१ | परिवहन सेवेचे सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे. |

दिनांक :- ०९/०२/२०१७.

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा

दिनांक १०/०२/२०१७

// गोषवारा //

प्रकरण क्र. १२६ मौजे उत्तन,पाली येथे घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाकरिता **DBFOT** तत्वावर प्राप्त झालेली निविदेस मंजुरी मिळणेबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिकेने मौजे उत्तन, पाली येथे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प DBFOT तत्वावर उभारण्याकरिता निविदा दि.०४/०२/२०१६ रोजी प्रथम निविदा मागविण्यात आली. तद्नंतर दुसऱ्यांदा दि.२७/०५/२०१६ रोजी, तसेच तिसऱ्यांदा दि.०६/०७/२०१६ रोजी तद्नंतर दि.०५/०८/२०१६ रोजी चौथ्यांदा तद्नंतर दि.३०/०९/२०१६ रोजी पाचव्यांदा यांनतर दि.११/११/२०१६ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आल्या होत्या.

दि. ११/११/२०१६ रोजी मागविण्यात आलेल्या निविदेस प्रतिसाद देऊन मे. सौराष्ट्र इन्वायरो प्राजेक्ट प्रा.लि. यांनी निविदेतील अटीशर्ती नुसार निविदा सादर केली होती. निविदा समितीने दि. २३/११/१६ रोजी तांत्रिक लिफाफयातील कागदपत्रांची तपासणी करुन दराचा लिफाफा उघण्यास मंजुरी दिली होती.

निविदाकार मे.सौराष्ट्र इन्वायरो प्राजेक्ट प्रा.लि. यांनी दराच्या लिफाफा मध्ये प्रती टन रु.११७०/- टिपींग फी सादर केली होती. निविदाकाराने टिपिंग फी जास्त नमुद केली असल्याने निविदा कारा समवेत दर कमी करणेबाबत वाटाघाटी दि.२९/१२/२०१६ ,दि. ३०/१२/२०१६, दि. ४/०१/१७ व दि. १२/०१/१७ रोजी मा. आयुक्त व निविदा समिती यांच्या उपस्थितीत करण्यात आल्या.

सदर वाटाघाटी नंतर मंजुर दरास निविदा काराने प्रकल्प उभारणी करणे कामास लेखी सहमती दर्शविली व या बाबतचे संमती पत्र महानगरपालिकेस दिले आहे.वाटाघाटी खालील प्रमाणे आहे.

अ) सदरचा प्रकल्प कार्यादेश प्राप्त झाल्यापासून सहा महिन्याच्या आत पुर्ण करण्याचे ठरले.

ब) निविदाकारास प्रकल्प ७ वर्षा पर्यंत कार्यान्वित करण्याचे ठरले.

क) भांडवली खर्चाची गुंतवणुक (व्याज) परत फेड यासाठी प्रथम वर्षी प्रति टन २३० रुपये व त्यावर दरवर्षी १० टक्के वाढ देण्याचे उभय पक्षाने मान्य केले. सदरचा प्रकल्प करिता महानगरपालिका ७ वर्षा नंतर कुठल्याही प्रकारची भांडवल खर्च परत फेड करणार नाही.

ड) सदरचा प्रकल्प चालविणे व दैनंदिन देखभाल दुरुस्तिसाठी टीपिंग फी म्हणुन प्रथम वर्षी ४१८ रुपये प्रति टन देण्यात येईल व यामध्ये दर वर्षी ५ टक्के वाढ देण्याचे ठरले आहे.

इ)जर निविदा काराने प्रकल्प चांगला चालविला व आय आय टी,मुंबई यांनी प्रकल्पाची गुणवत्ता तपासुन त्यांनी शिफारस केली तर अतिरिक्त २ टक्के वाढ incentive म्हणुन प्रकल्प चालविणे व दैनंदिन देखभाल दुरुस्तिसाठी टीपिंग फी यावर देण्यात येईल.

फ) सदरचा प्रकल्प बांधकाम उभारणीपासून पुर्ण कार्यान्वित होईपर्यंत व तद्नंतर प्रकल्पावर देखरेख व नियंत्रण ठेवण्या करिता Project management consultancy म्हणून आय आय टी मुंबई यांची नेमणुक राहिल व त्यांची फी महानगरपालिका देईल व आय आय टी चे नियंत्रण निविदाकारावर बंधनकारक राहिल. सदरचा प्रकल्प DBFOT तत्वावर असल्याने ७ वर्षा नंतर सदर प्रकल्पाची मालकी महानगरपालिकेची राहिल.

मा.एन.जी.टी. पुणे यांनी Application No. 65/2015(WZ). मिरा भाईंदर महानगरपालिका घनकचऱ्यावर प्रकिया करत नसल्याने ७० कोटी रुपये एस्क्रो अकाऊंट मध्ये मा.विभागिय आयुक्ता कडे जमा करण्याबाबत सुनावणी चालु आहे व त्याची पुढील सुनावणी ७/२/१७ रोजी आहे त्यापुर्वी निविदाकारास कार्यादेश देणे आवश्यक आहे. तरी उपरोक्त निविदा मान्यतेस शिफारस आहे.

(डॉ. नरेश गिते)

आयुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. ७/२/२०१४ वेळ १२.३०

मा. स्थायी समिती / [illegible] गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. ९००

लिपीक

नगरसचिव विभाग.

प्रकरण क्र. ११७ ते १२
कमिता

मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभेपुढे घ्यावयाचे विषय

१) सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ चे मूळ "अ" + "क" + "अंध व अपंग" + "महिला व बालकल्याण" + "अंध व अपंग" + "JNNURM" + "P" या अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत.

२) सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ चे " अग्निशमन अंदाजपत्रकास " मंजूरी मिळणेबाबत.

३) वृक्षप्राधिकरण समितीने मंजूर केलेले सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत.

४) शिक्षण विभागचे सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत.

५) परिवहन सेवेचे सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत.

( डॉ. नरेश गिते )
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. ५/१/२०१८ वेळ ५:३०

मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. ९८

५/१/१८

लिपिक

नगरसचिव विभाग.